# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- १६/१२/२०१८

## विघ्नहर्ता बक्षीस योजने अंतर्गत निफाड उपविभागात विजेते गणेश मंडळांना मा.पोलीस अधीक्षक सो. यांचे हस्ते बक्षीस वितरण

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे सकल्पनेतुन जिल्हयात गणेशोत्सव काळात **विघ्नहर्ता बक्षीस योजना** राबविण्यात येत असुन सदर योजने अंतर्गत जिल्हास्तर, उपविभागस्तर तसेच पोलीस स्टेशन स्तर असे तीन स्तरावर परीक्षण समिती नेमण्यात येवुन परीक्षण समितीचे कार्यक्षेत्रातील गणेश मंडळाची समिती सदस्य हे प्रत्यक्ष पाहणी करून गणेश मंडळाकडुन कशा प्रकारे गणेशोत्सव साजरा करण्यात येतो, गणेशोत्सवा दरम्यान उभारण्यात आलेले देखावे हे समाज उपयोगी संदेश देतात काय ? व पर्यावरण संरक्षण कायदा व इतर प्रचलित कायदयांचे उंलघन होवु नये म्हणुन कोणत्या उपाय योजना केल्या? गणेशोत्सव साजरा करतांना सामाजिक बांधिलकी जोपसली आहे का? वगैरे दहा मुंदयावर गुण देवुन त्यातुन पोलीस स्टेशन स्तर, उपविभागस्तर व जिल्हास्तर प्रत्येकी प्रथम, द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ असे पाच मंडळाची निवड केली. त्या अंतर्गत दिनांक १५/१२/२०१८ रोजी सायंकाळी १६/३० ते १८/०० वा दरम्यान लासलगाव येथील शिवकमल मंगल कार्यालय येथे लासलगाव पोलीस स्टेशन, निफाड पोलीस स्टेशन, सायखेडा पोलीसस्टेशन तसेच निफाड उप विभागातील निवड करण्यात आलेले प्रत्येकी पाच गणेश मंडळातील पदाधिकारी यांना ट्रॉफी/मोमेंटो दुवन त्यांचा सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमास **अध्यक्ष म्हणुन मा. संजय दराडे सो, पोलीस अधीक्षक** नाशिक ग्रामीण व प्रमुख अतिथी म्हणुन **मा. माधव पडीले उपविभागीय पोलीस अधिकारी, निफाड** विभाग निफाड तसेच मा. विष्णु आव्हाड पोलीस निरीक्षक निफाड पोलीस स्टेशन, मा. अंबादास मोरे पोलीस निरीक्षक सायखेडा पोलीस स्टेशन, श्री.ज्ञानेश्वर जगताप, जि.प. सदस्य, श्री. प्रकाश पाटील, श्री.राजु चाफेकर व विजेते गणेश मंडळाचे पदाधिकारी व समाजातील प्रतिष्ठीत नागरीक व पत्रकार बांधव उपस्थित होते.

तसेच पोलीस अधीक्षक सो यांनी विघ्नहर्ता बक्षीस परीक्षण समितीतील परीक्षक यांनी सत्कार केला व प्रभारी अधिकारी लासलगाव पोलीस स्टेशन शिवचरण पांढरे यांनी प्रस्तावना मांडली. मा. श्री. माधव पडीले साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी निफाड यांनी मनोगत व्यक्त केले नतंर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री संजय दराडे साहेब पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांनी अध्यक्षीय भाषणात सर्व समाजातील लोकांनी सामाजिक बांधिलकी जोपासावी, कायदा व नियमांचे पालन करून गणेशाोत्सव शांततेत व आंनदात साजरा करावा या उददेशाने विघ्नहर्ता बक्षीस योजना सुरु केल्याचे नमुद करून यापुढेही अशाच प्रकारे शांततेने व एकोप्याने सर्व धर्मीयांचे सण उत्सव साजरे करणे बाबत आवाहन केले. कार्यक्रमाचे शेवटी मा.श्री अंबादास मोरे पोलीस निरीक्षक सायखेडा पोलीस स्टेशन यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमांची सांगता झाली.सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री तुषार देवरे लासलगाव यांनी केले.

## निफाड उपविभागातील विघ्नहर्ता बक्षीस योजनेतील विजेते गणेश मंडळ खालीलप्रमाणे--

### लासलगाव पोलीस स्टेशन

| अन | गणेश मंडळाचे नाव | अध्यक्षाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | क्रांतीमित्र मंडळ, श्रीरामनगर, लासलगाव | उत्तम नागरे | **प्रथम** |
| २ | राजमुद्रा ग्रुप सुमतीनगर, लासलगाव | रोहित सोनवणे | **द्वितीय** |
| ३ | शास्त्रीनगर युवकमित्र मंडळ, पिंपळगाव न | योगेश बैरागी | **तृतीय** |
| ४ | बजरंग मित्र मंडळ, विंचुर ता निफाड | भारत महाले | **उत्तेजनार्थ** |
| ५ | गजराज फाऊंडेशन सन्मित्र नगर विंचुर | आदित्य दरेकर | **उत्तेजनार्थ** |

### सायखेडा पोलीस स्टेशन

| अन | गणेश मंडळाचे नाव | अध्यक्षाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | नवचैतन्य मित्र मंडळ चांदोरी | गणेश पुंडलीक गडाख | **प्रथम** |
| २ | आदर्श मित्र मंडळ चांदोरी | सिध्दार्थ माणिक वनारसे | **द्वितीय** |
| ३ | श्रीगणेशा ग्रुप चापडगाव | गोकुळ रामनाथ दराडे | **तृतीय** |
| ४ | श्रीमंतमित्र मंडळ कॉलेजरोड | गणेश शरद रसाळे | **उत्तेजनार्थ** |
| ५ | सक्सेस अॅकडमी चांदोरी | प्रिया प्रकाश टर्ले | **उत्तेजनार्थ** |

### निफाड पोलीस स्टेशन

| अन | गणेश मंडळाचे नाव | अध्यक्षा चेनाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | गजराज मित्र मंडळ गणेशनगर निफाड | तन्मय संजय आव्हाड | **प्रथम** |
| २ | ओमजनार्दन मंडळ स्वामीनगर निफाड | वैभव बाळासाहेब बोराडे | **द्वितीय** |
| ३ | रूद्राक्ष मित्र मंडळ पिपंळस रामाचे | रविंद्र ज्ञानेश्वर ताजणे | **तृतीय** |
| ४ | गंगामध्यमेश्वर मित्र मंडळ नांदुर मध्यमेश्वर | संतोष पुंडलिक शेळके | **उत्तेजनार्थ** |
| ५ | विघ्नहर्ता गणेश मंडळ रूण्वाल नगर निफाड | अभिषेक मुकेश बगडे | **उत्तेजनार्थ** |

### निफाड उपविभाग

| अन | गणेश मंडळाचे नाव | अध्यक्षाचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री.गणेशा ग्रुप चापडगाव ता.निफाड | गणेश पुंडलिक गडाख | **प्रथम** |
| २ | बजंरग मित्र मंडळ विंचुर | भारत महाले | **द्वितीय** |
| ३ | नाशिक वेसमित्र मंडळ सिन्नर | सुनिल आव्हाड | **तृतीय** |
| ४ | विघ्नहर्ता गणेश मंडळ रूण्वालगनर निफाड | अभिषेक मुकेश बगडे | **उत्तेजनार्थ** |
| ५ | गजराज फाऊंडेशन सन्मित्रनगर विंचुर | आदित्य दरेकर | **उत्तेजनार्थ** |
| ६ | क्रांती मित्र मंडळ श्रीरामनगर लासलगाव | उत्तम नागरे | **उत्तेजनार्थ** |